## श्री.खाडिलकर मॅन ऑफ दी ईयर पुरस्काराने सन्मानित



गत आर्थिक वर्षापासुन (२००८-२००९). भुसावळ औ.वि.केंद्रातील कर्मचारी, अभियंता व इतर यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोस्ट एमओआरएम मध्ये त्या कर्मचाऱ्यांना प्रशस्तीपत्र देण्याबद्दल प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता. त्यामुळे प्रत्येक विभागातील कर्मचारी या दिवसाची वाट बघत असतात. सर्व कर्मचाऱ्यांमध्ये नविन उत्साह निर्माण झाला आहे. ही वाटचाल अशीच सतत सुरू राहावी व कर्मचाऱ्यांमध्ये जागरुकता निर्माण व्हावी म्हणून असे कार्यक्रम राबविल्यास आपल्या कंपनीला नक्कीच फायदा होईल.

त्यातील एक भाग म्हणून भुसावळ औ.वि.के. दीपनगर येथील श्री.विनोद पां.खाडीलकर, अधीक्षक अभियंता यांनी सन २००८-२००९ चा मॅन ऑफ दी ईयर चा बहुमान पटकाविला. सन २००८-२००९ या वर्षातील त्यांनी केलेली कामगिरी अत्यंत उत्तम होती व त्यांचे चक्रसंधारण या विभागातील आव्हानात्मक केलेली मोलाची कामगिरी व त्यांचेवर दिलेली जबाबदारी अथक परिश्रम घेऊन पूर्ण केली आहे. प्रत्येक कामाचे स्वरूप वेगवेगळे असले तरी त्यांनी ते आव्हान स्विकारले होते. त्यामुळे त्यांनी पाण्यावर (Raw Water) वर होणारा खर्च कमी करून कंपनीचे २,९५,७४,६४३ रु. वाचविले, तसेच जलप्रक्रिया विभागात केमिकलवर होणारा खर्च ४०,२९,१९२ रु. नी कमी केला. त्यांनी कंपनीसाठी केलेली बचत ही उल्लेखनीय आहे. पोस्ट एमओआरएम मिटींग मधे श्री.व्ही.एस. पाटील मुख्य महाव्यवस्थापक, श्री.संजय गट्टेवार महाव्यवस्थापक यांनी त्यांच्या कामगिरीबद्दल कौतुक केले व गुलाबपुष्प देवून त्यांना सन्मानित करण्यात आले. नविन आर्थिक वर्षात प्रत्येकांनी याही पेक्षा चांगली कामगिरी करावी असे सर्व उपस्थितांना आवाहन केले.



परळी औ.वि. केंद्रात चक्रमाला सुव्यवस्था टप्पा क्र. १ येथे कार्यरत असलेले श्री.एस.जी. देशमुख कारागीर 'अ' यांचा मुलगा चि.शिवकुमार श्री.गुरूगोविंदसिंहजी इन्स्टियुट ऑफ टेक्नॉलॉजी, नांदेड, तृतीय वर्ष अभियांत्रिकी शिकत असून कल्याणी ग्रुप तर्फे दिनांक ०६.०३.२००९ ते ०८.०३.२००९ पर्यंत राष्ट्रीय पातळीवर आयोजित तांत्रिक कार्यक्रम प्रज्ञा २००९ मध्ये तो सहभागी झाला. त्याने तयार केलेला Open Software या तांत्रिक निर्मितीस प्रथम क्रमांकाने गौरविण्यात आले.



कु.नम्रता गजानन गावंडे ही सन २००९ च्या माहिती व तंत्रज्ञान अभियांत्रिकी पदविका अंतिम परिक्षेत ९३.०७% गुण विळवून शासकीय तंत्रनिकेतन, सामनगाव, नाशिक (स्वायत्त) येथील सर्व शाखेमधुन पहिली आली.

विशेष म्हणजे कु.नम्रता हिने सतत तिनही वर्षे १ ला क्रमांक मिळवून हॅटट्रिक साधली आहे. तंत्र शिक्षण मंडळाच्या सन २००९ साली घेतलेल्या अंतिम परिक्षेत नाशिकचाच विद्यार्थी ९२% गुण मिळवून पहिला आला आहे. परंतु शासकीय तंत्रनिकेतन नाशिक स्वायत्त असल्यामुळे राज्यवार गुणवत्ता यादी उपलब्ध नाही.

कु.नम्रता ही वैतरणा जल विद्युत केंदाचे कार्यकारी अभियंता श्री.गजानन तुकाराम गावंडे यांची मुलगी आहे.

## शर्वरी हारोडेचे सुयश



नागपूर येथे TI&C येथे कार्यरत सहाय्यक अभियंता श्री.पी.जी. हारोडे आणि डायरेक्टर, राईट व्हॅल्यू इन्स्टिट्युट ऑफ नर्सिंग नागपूर, श्रीमती नीलिमा हारोडे यांची कन्या कु.शर्वरी हिने १० वी CBSC परिक्षेत ९६.२% मार्कस घेवून गुणवत्ता यादीत स्थान मिळविले, संस्कृत विषयात तिला १०० गुण मिळाले. उल्लेखनीय बाब म्हणजे तिने हे यश तिच्या स्पोर्टस आणि इतर गतिविधींमध्ये सातत्याने सहभाग करून मिळविले. बॅडमिंटनचा दररोज सराव आणि वर्षभर विविध शहरांमध्ये शाळेतर्फे मॅचेस खेळायला जावूनही तिने यश संपादन केले, सोबतच हाऊस - कॅप्टनची जबाबदारीही संपूर्ण शालेय जीवनात उत्कृष्टपणे पार पडली.

## इंजिनियर श्री.बी.जी. भगत व श्री.पी.एम.चौधरी यांची जर्मनीस भेट



श्री.बी.जी. भगत

महानिर्मिती कंपनीची औष्णिक वीज केंद्रे ही जुनी झालेली आहेत. महानिर्मितीची क्षमता वाढविण्याच्या उद्देशाने केंद्रीय ऊर्जामंत्रालय भारत सरकार यांनी जर्मन दौरा आयोजित केला होता. या अभ्यास दौऱ्यामधे केंद्रीय ऊर्जामंत्रालयाचे प्रतिनिधी, केंद्रीय विद्युत प्राधिकरणाचे (Central Electricity Authority) दामोदर व्हॅली लिगलाईट कार्पोरेशन, जी.आय.पी.सी.एल., गुजरात इलेक्ट्रिकल कार्पोरेशन, झारखंड राज्य विद्युत मंडळाच्या सोबतच महानिर्मितीकडून इंजि. बी.जी. भगत यांची निवड करण्यात आली होती.

नुकतीच त्यांनी दिनांक ०१ मार्च २००९ ते १५ मार्च २००९ पर्यंत जर्मन व युरोपला भेट देवून तेथील एस.एन., डसल ड्रॉप, हॅनावर, हेडन, बर्लिन या शहरांना भेट देवून तेथील इव्हॉनिक पॉवर स्टेशन, इऑन पॉवर स्टेशन, व्हॅटनफॉल पॉवर स्टेशन, प्रोमोकॉन कंपनी, टर्बाईन निर्मिती करणाऱ्या सिमेन्स कंपनीसोबतच व्ही.जी.बी. संस्थेला भेट दिली. व्ही.जी.बी. पॉवर स्टेशनमधे पॉवर मॅनेजमेंटबाबत जगातील सर्वात मोठ्या संस्थेला भेट देवून तेथील कार्यप्रणालीचा अभ्यास करून ती जाणून घेतली. भेट दिलेल्या सर्व पॉवर स्टेशनमधे प्रत्येक विभागाला भेटी देवून तेथील कार्यप्रणालीचा अभ्यास केला. त्याचा महानिर्मितीकरिता कसा उपयोग करता येईल हयाकडे प्रामुख्याने विचार करण्याचा इंजि.बी.जी. भगत यांचा मानस आहे. या अभ्यास दौऱ्यात जर्मन येथील संसदेला सुद्धा त्यांनी भेट दिली.



श्री.पी.एम. चौधरी

नाशिक औ.वि. केंद्र, टप्पा क्र. एकलहरे येथे कार्यरत असलेले श्री.पी.एम. चौधरी, महाव्यवस्थापक यांनी नुकतीच २२ मार्च २००९ ते ०५ एप्रिल २००९ पर्यंत जर्मन व युरोपला भेट देवून तेथील इव्हॉनिक पॉवर स्टेशन, इऑन पॉवर स्टेशन, व्हॅटनफॉल पॉवर स्टेशन इ.कंपन्यासोबत व्ही.जी.बी. संस्थेला भेट देवून तेथील कार्यप्रणालीचा अभ्यास करून ती जाणून घेतली व त्याचा महानिर्मितीच्या भरभराटीसाठी कसा उपयोग करून घेता येईल यासाठी त्यांचा प्रयत्न चालू आहे.

## परळी वीजकेंद्राची विक्रमी कामगिरी

परळी येथील संचाने क्रमांक १ वार्षिक देखभालीनंतर दिनांक ११.१२.२००८ ते २६.०४.२००९ पर्यंत अविरतपणे १३५ दिवस सुरू राहून विक्रम प्रस्थापित केलेला आहे. तसेच संच क्र. २ने दीर्घकालीन वार्षिक देखभालीनंतर २१.१२.२००८ पासून आजपावेतो अविरतपणे १४२ दिवस सुरू राहून नविन विक्रम प्रस्थापित केलेला आहे. या बद्दल मुख्य महाव्यवस्थापक, परळी वैजनाथ यांनी टप्पा क्र. १ (२×२० मेवॅ) मधील कर्मचारी / अभियंते / कंत्राटी कामगार यांचे अभिनंदन केले असून, यशाची पताका अशीच फडकत ठेवण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.